महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १९१ वे | दिनांक : ०५/०७/२०२६ | वार : रविवार

## “राणे स्टाईल” आता जुनी; विनायक राऊतांचा सरकारवर हल्लाबोल



**मुंबई** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार विनायक राऊत यांनी पत्रकार परिषदेत राज्य सरकार, भाजप आणि केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. मुंबईतील मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवरून त्यांनी मुंबई महानगरपालिका आणि भाजपच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

त्याचबरोबर मुंबई-गोवा महामार्ग, कोकणातील प्रस्तावित अणुऊर्जा प्रकल्प, रामरक्षा आंदोलन आणि पक्षांतराच्या राजकारणावरही त्यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली.

मुंबईत पुन्हा एकदा मुसळधार पावसानंतर अनेक भाग जलमय झाल्याच्या पार्श्वभूमीवर राऊत म्हणाले की, पूर्वी सत्तेत असताना भाजप शिवसेनेवर आरोप करत होती, मात्र आज परिस्थिती उलट झाली आहे. मुंबईकर भाजपच्या कारभाराला कंटाळले असून पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कामे केवळ कागदावर झाली, असा आरोप त्यांनी केला.

त्यांच्या मते, मोठ्या ठेकेदारांकडून नालेसफाईच्या नावाखाली निधी खर्च झाला, मात्र प्रत्यक्षात मिठी नदी, वाकोला नाला आणि इतर प्रमुख नाले कचऱ्याने भरलेलेच राहिले. त्यामुळे पावसात संपूर्ण मुंबई तुंबली असल्याचे त्यांनी सांगितले.

राऊत यांनी उघड्या मॅनहोलमुळे घडलेल्या दुर्घटनांचाही उल्लेख केला. महापौरांच्या दौऱ्यादरम्यान एका अधिकाऱ्याचा मॅनहोलमध्ये पडण्याचा प्रसंग घडल्याचे सांगत, यापूर्वीही अनेकांनी अशा दुर्घटनांमध्ये जीव गमावल्याचा दावा त्यांनी केला.

झाडे कोसळण्याच्या घटनांवरूनही त्यांनी प्रशासनावर टीका केली. झाडांच्या फांद्यांची वेळेवर छाटणी न झाल्याने आणि धोकादायक झाडे हटवण्यात निष्काळजीपणा झाल्याने नागरिकांचे जीव धोक्यात येत असल्याचे त्यांनी म्हटले. एका शालेय विद्यार्थ्याचा झाड पडून मृत्यू झाल्याची आठवण करून देत, स्वतःच्या इमारतीजवळील धोकादायक झाडाबाबत वर्षभरापूर्वी तक्रार करूनही पालिकेने दखल घेतली नसल्याचा आरोप त्यांनी केला.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या कामावरूनही राऊत यांनी केंद्र सरकार आणि राज्य सरकारला लक्ष्य केले. रायगडमधील माणगाव ते इंदापूर हा पट्टा 'मृत्यूचा सापळा' बनल्याचा दावा करत त्यांनी संरक्षक भिंती कोसळणे, रस्ते खचणे आणि पुलांची दुरवस्था यामुळे मोठा धोका निर्माण झाल्याचे सांगितले.

महामार्गाबाबत अनेक वेळा लेखी तक्रारी करूनही कोणतीही कारवाई झालेली नसल्याचे सांगत, या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालय आणि राज्य सरकारची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मॅनहोल दुर्घटनेनंतर भाजप प्रदेशाध्यक्षांच्या कथित प्रतिक्रियेवरही त्यांनी आक्षेप घेतला. अशा गंभीर घटनेवर उपहासात्मक प्रतिक्रिया देणे म्हणजे मुंबईकरांचीच चेष्टा असल्याचे ते म्हणाले. मुंबईच्या उपमहापौरांनी दिलेल्या परखड प्रतिक्रियेचे त्यांनी कौतुकही केले.

राऊत यांनी सिंधुदुर्गातील कायदा-सुव्यवस्थेवरही गंभीर आरोप केले. सिंधुदुर्गात ड्रग्ज, मटका आणि हिंसाचाराच्या घटना वाढल्याचा दावा करत त्यांनी पोलिस प्रशासन अपयशी ठरल्याचे म्हटले. तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून नारायण राणेही पूर्णपणे अपयशी ठरल्याची टीका त्यांनी केली.

कोकणातील प्रस्तावित अणुऊर्जा प्रकल्पांवरूनही त्यांनी सरकारवर हल्लाबोल केला. जयतापूरनंतर आता देवगड परिसरातही अणुऊर्जा प्रकल्प आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत, कोकणच्या विनाशाला कारणीभूत ठरणाऱ्या कोणत्याही प्रकल्पाला शिवसेना विरोध करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

त्याऐवजी कोकणात पर्यटन, सोलर पार्क, टेक्स्टाईल पार्क, ग्रामीण पर्यटन आणि रोजगारनिर्मिती करणारे उद्योग आणावेत, अशी मागणी त्यांनी केली. स्कूबा डायव्हिंगसारख्या पर्यटन व्यवसायातून स्थानिक युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळू शकतो, असेही त्यांनी सांगितले.

नारायण राणे यांच्या वक्तव्यावर प्रत्युत्तर देताना विनायक राऊत म्हणाले, "राणे स्टाईलने उत्तर देण्याचे दिवस गेले आहेत. आम्हीही मेलेल्या आईचे दूध प्यायलेलो नाही." मंत्री आणि खासदार झाल्यानंतरही राणे यांच्या बोलण्याची पद्धत बदललेली नसल्याची टीकाही त्यांनी केली.

सत्ताधारी पक्ष स्वतःच्या विचारांचे लोकप्रतिनिधी निवडून आणण्याऐवजी विरोधी पक्षातील आमदार-खासदारांना कोट्यवधी रुपये देऊन पक्षात घेत असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. ही लोकशाहीसाठी अत्यंत दुर्दैवी बाब असल्याचे ते म्हणाले.

अयोध्येतील राम मंदिरातील कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू होणाऱ्या 'रामरक्षा आंदोलनाची' माहितीही राऊत यांनी दिली. रामाच्या नावाने जमा झालेल्या देणग्या आणि सोन्याच्या विटांबाबत झालेल्या कथित गैरव्यवहाराविरोधात हे आंदोलन असल्याचे त्यांनी सांगितले.

उद्यापासून राज्यभर आंदोलन सुरू होणार असून मुंबईतील दादर येथील हनुमान मंदिरात महाआरती, रामरक्षा, हनुमान स्तोत्र आणि हनुमान चालीसाचे सामूहिक पठण करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

## उद्धव ठाकरेंना “चांगली बुद्धी” सुचली; बावनकुळेंची खोचक टीका



**नागपूर** : अयोध्येतील राम मंदिराच्या बांधकामातील कथित अनियमितता आणि दानपेट्यांच्या चोरीच्या मुद्द्यावरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पाच तारखेला राज्यभरात 'घंटानाद' आणि 'रामरक्षा आंदोलन' करण्याची घोषणा केली आहे. त्यांच्या या घोषणेवर आता भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी जोरदार निशाणा साधला आहे. "मतांचे लांगूलचालन आणि काँग्रेससोबतची अभद्र युती टिकवण्यासाठी प्रभू रामचंद्राकडे पाठ फिरवणाऱ्या ठाकरेंना आता उशिरा का होईना चांगली बुद्धी सुचली आहे. त्यांनी हिंदुत्वाचे हे विचार थोडे दिवस तरी टिकवून ठेवावेत," असा खोचक टोला बावनकुळे यांनी लगावला आहे.

बावनकुळे यांनी नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत राज्यातील विविध घडामोडींवर सविस्तर भाष्य केले.

उद्धव ठाकरेंच्या रामरक्षा आंदोलनावर टीका करताना बावनकुळे म्हणाले, "जेव्हा संपूर्ण देश आणि राज्याचा आग्रह होता की उद्धव ठाकरेंनी अयोध्येला जावे, तेव्हा त्यांनी तिकडे बघणेही टाळले. काँग्रेसच्या नेत्यांना वाईट वाटेल आणि आपली काँग्रेस-राष्ट्रवादीसोबतची अभद्र युती बिघडेल, या भीतीने त्यांनी प्रभू रामचंद्राशी फारकत घेतली होती. मतांच्या लांगूलचालनासाठी त्यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंचे विचारही सोडले."

"आता पक्षातील खासदार, आमदार आणि हिंदुत्ववादी कार्यकर्ते सोडून जात असल्यामुळे केवळ त्यांचा रोष कमी करण्यासाठी आणि राजकीय फायद्यासाठी ठाकरेंनी हे आंदोलन पुकारले आहे. नवनीत राणा यांनी हनुमान चालिसा पठण केले तेव्हा त्यांना 14 दिवस तुरुंगात टाकणाऱ्या ठाकरेंना आता रामाची आठवण आली आहे. उशिरा का होईना त्यांना चांगली बुद्धी सुचली आहे, आता ती त्यांनी काही काळ तरी टिकवून ठेवावी, नाहीतर ते पुन्हा काँग्रेसच्याच मार्गावर जातील."

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड., एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.टी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

## पाऊस आला...

पाऊस आला, धरती हसली,कोरड्या मातीला ओल मिळाली.
थेंबांच्या त्या मधुर गाण्याने,साऱ्या सृष्टीला नवी फुटली पालवी.

शेतकऱ्याच्या डोळ्यांमध्ये,आशेचा पुन्हा उजेड दाटला.
हिरव्या शिवाराच्या स्वप्नांनी,जीवनाचा नवा धागा विणला.

मोर नाचला पंख पसरून,पाखरांनी सूर छेडले गोड.
नद्या-नाले वाहू लागले,निसर्ग आनंदाने आला ओथंबून.

पाऊस फक्त पाणी नसतो,तो जगण्याचा नवा श्वास असतो.
कोरड्या मनालाही तो सांगतो, अंधारानंतरच उजेड फुलत असतो.

प्रत्येक पावसाच्या सरीत,निसर्गाचे सौंदर्य दडलेले असते.
ज्यांना थेंबांचे मोल कळते,त्यांच्या आयुष्यातच
इंद्रधनुष्य फुलत असते.



**- डॉ.बाळासाहेब लिहिणार**

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडीची इमारत धोकादायक; नवीन इमारतीची ग्रामस्थांची मागणी




**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** खुलताबाद तालुक्यातील निरगुडी बु,ठाकरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची जुनी इमारत सध्या अत्यंत मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहे. इमारतीच्या भिंतींना तडे गेले असून छताची पडझड होण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.दररोज लहान मुले या धोकादायक इमारतीत शिक्षण घेत असल्याने पालक व ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पावसाळ्यात गळती, ओलावा आणि इमारतीची वाढती जीर्ण अवस्था यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि दर्जेदार शिक्षणाचे वातावरण मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे.ठाकरवाडीसारख्या दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनाही शहरांप्रमाणे सुरक्षित शैक्षणिक सुविधा मिळाल्या पाहिजेत. त्यामुळे संबंधित प्रशासनाने तातडीने या शाळेची पाहणी करून नवीन शाळा इमारतीस मंजुरी द्यावी किंवा जुन्या इमारतीच्या जागी सुरक्षित व सुसज्ज इमारत उभारावी, अशी ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थ्यांची मागणी आहे.महाराष्ट्रातील अनेक जिल्हा परिषद शाळांच्या जीर्ण अवस्थेबाबत यापूर्वीही चिंता व्यक्त करण्यात आली असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी धोकादायक शाळा इमारतींबाबत तातडीने कारवाई करण्याचे निर्देशही शासनाने दिले आहेत.विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन ठाकरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या नवीन इमारतीचे काम तातडीने हाती घेण्यात यावे, हीच सर्व ग्रामस्थांची अपेक्षा आहे.






## पाऊस, पर्यटन आणि उरूसमुळे दौलताबाद मार्गावर वाहतुकीचा खोळंबा



**दौलताबाद (जावेद अहमद) :** दौलताबाद खुलताबाद रस्त्यावर असलेल्या दिल्ली दरवाजा येथे एक वाहन एक वेळी जाते पण काही वाहनचालक न जुमानता आपली वाहने येथे घुसवल्या ने नेहमीच ट्राफिक जाम होऊन जाते मागील वर्षी रस्त्याच्या मध्यभागी प्लास्टिक बोलार्ड लावण्यात आले होते त्यामुळे वाहन चालकाना नियंत्रण ठेवता आले होते पण ते बऱ्याच ठिकाणी तुटले आहे ते परत लावले तर वाहतूक व्यवस्था करण्यासाठी मदत होईलआज रविवार असल्याने पर्यटनासाठी आलेले पर्यटक व खुलताबाद येथे सुरु असलेल्या उरूस साठी शहरातील तसेच जिल्ह्यातील व परजिल्हा तील मोठ्या प्रमाणावर दर्शनासाठी येतात आज शनिवार असल्याने व सकाळ पासून पाऊस सुरू असल्याने पर्यटनासाठी व भद्रा मारुतीच्या दर्शनासाठी भाविक व पर्यटकांची वाहनांच्या रांगच रांग लागल्या होत्या दुपारी अचानक पाऊस आल्याने अनेक दुचाकी स्वार रस्त्यावर झाडाखाली व हॉटेल पेट्रोल पंप येथे थांबले होतेनंतर पाऊण कमी झाल्याने सर्व वाहने एकच वेळी रस्त्यावर आल्याने दिल्ली दरवाजा पासून दौलताबाद किल्ला पर्यंत वाहनाची रांग लागली होती तर वर घाट वर एक ते दोन किलोमीटर पर्यंत वाहतूक विस्कळीत झाली होतीछावणी वाहतूक शाखा व दौलताबाद पोलिसांनी प्रयत्न करत वाहतूक सुरळीत केली


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०५ जुलै २०२६


## रस्त्यावर पाणी, चिखल आणि नागरिकांची गैरसोय; माने नगरवासीयांचा आक्रोश



**उमरगा (प्रा.सुधीर पंचगल्ले)** : उमरगा शहरातील माने नगर, मूकबधिर शाळेजवळील परिसरात आज, दि. ३ जुलै २०२६ रोजी सायंकाळी झालेल्या पावसानंतर रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था समोर आली. अवघ्या काही वेळ झालेल्या पावसातच रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी व चिखल साचल्याने नागरिकांना ये-जा करणे कठीण झाले. परिणामी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण तसेच दुचाकीस्वारांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला.परिसरातील रहिवासी महंमदरफी शेख यांनी या प्रश्नावर तीव्र नाराजी व्यक्त करत सांगितले की, गेल्या दहा वर्षांपासून माने नगरातील नागरिक रस्ता, गटार आणि जलनिस्सारणाच्या समस्येमुळे त्रस्त आहेत. प्रत्येक पावसाळ्यात हीच परिस्थिती निर्माण होत असून, नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होते. अनेक वेळा संबंधित लोकप्रतिनिधी आणि नगर परिषद प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही आजपर्यंत कायमस्वरूपी उपाययोजना झालेली नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.महंमदरफी शेख यांनी संबंधित नगरसेवक, नगराध्यक्ष आणि इतर लोकप्रतिनिधींना जाब विचारत, "निवडणुकीच्या काळात विकासाची मोठी आश्वासने दिली जातात; मात्र निवडून आल्यानंतर नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष का केले जाते? माने नगरातील नागरिकांना चांगले रस्ते आणि जलनिस्सारणासारख्या मूलभूत सुविधा मिळणार तरी कधी?" असा संतप्त सवाल उपस्थित केला.नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे अपघाताचा धोका वाढला असून, दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना घडत आहेत. शाळकरी विद्यार्थ्यांना चिखलातून मार्ग काढत शाळेत जावे लागत आहे, तर ज्येष्ठ नागरिक व महिलांना घराबाहेर पडणेही कठीण झाले आहे. पावसाळ्यात आपत्कालीन सेवांनाही या परिसरात पोहोचण्यास अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली.महंमदरफी शेख यांनी संबंधित नगरसेवक, नगराध्यक्ष, सर्व लोकप्रतिनिधी आणि नगर परिषद प्रशासनाने तातडीने या परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून रस्ता, गटार व जलनिस्सारणाची कामे युद्धपातळीवर हाती घ्यावीत, अशी जोरदार मागणी केली आहे. विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून ही समस्या कायमस्वरूपी सोडवावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली."आश्वासने नकोत, विकास हवा," हीच आज माने नगरातील प्रत्येक नागरिकाची भावना असून, केवळ घोषणांपेक्षा प्रत्यक्ष कामे होणे ही काळाची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. आता संबंधित नगरसेवक, नगराध्यक्ष, लोकप्रतिनिधी आणि नगर परिषद प्रशासन या गंभीर समस्येची कितपत दखल घेतात आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी किती तत्परतेने कार्यवाही करतात, याकडे संपूर्ण माने नगरवासीयांचे लक्ष लागले आहे.

## जिंतूरमध्ये रस्त्यालगत कालबाह्य शीतपेयांचा मोठा साठा; दोषींवर कठोर कारवाईची मागणी




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : शहरातील वरूड रोडवरील मार्केट यार्ड परिसरात चिंतामणी वेअरहाऊसच्या मागील बाजूस मुख्य रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात कालबाह्य झालेल्या बाटलीबंद शीतपेयांचा साठा आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. सार्वजनिक ठिकाणी टाकण्यात आलेल्या या शीतपेयांच्या साठ्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून, या गंभीर प्रकारामागील जबाबदार व्यक्ती व संस्थांची चौकशी करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी संजय आडे यांनी केली आहे.नगर परिषदमुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात आडे यांनी नमूद केले आहे की, कालबाह्य अन्नपदार्थ व शीतपेयांची विल्हेवाट शासनाच्या नियमांनुसार लावणे बंधनकारक असताना मोठ्या प्रमाणात शीतपेयांचा साठा सार्वजनिक ठिकाणी टाकण्यात आल्याने त्यामुळे संबंधित व्यापारी, वितरक, गोदामधारक किंवा उत्पादक कंपनीने नियमांचे उल्लंघन केले आहे का, याची सखोल चौकशी करण्याची गरज निर्माण झाली आहे.विशेष म्हणजे हा साठा पुन्हा बाजारात विक्रीसाठी जाण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नसल्याने नागरिकांच्या आरोग्याशी खेळ होत असल्याचे तसेच परिसरात अस्वच्छता, दुर्गंधी आणि पर्यावरणीय प्रदूषण वाढण्याचाही धोका निर्माण झाला असल्याचे निवेदनातम्हटले असुन घटनास्थळी तात्काळ पंचनामा करून कालबाह्य शीतपेयांचा साठा जप्त करण्याची, त्याची सुरक्षित विल्हेवाट लावण्याची तसेच संबंधित मालाचा उगम शोधून जबाबदार व्यक्ती निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे. उत्पादन दिनांक, कालबाह्यता दिनांक, बॅच क्रमांक, वितरण साखळी व साठवणुकीची माहिती तपासून संपूर्ण प्रकरणाचा तपास करण्यात यावा, असेही नमूद करण्यात आले असुन दोषी आढळणाऱ्या व्यापारी, वितरक, गोदामधारक अथवा संबंधित कंपनीविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके अधिनियम 2006, घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 आणि इतर लागू कायद्यांनुसार दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात यावी. आवश्यक असल्यास संबंधित आस्थापन्यांचे परवाने निलंबित अथवा रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.दरम्यान, या प्रकरणाची चौकशी करून कार्यवाही अहवाल सार्वजनिक करावा, अशी मागणी नागरिकांतूनही होत आहे. या निवेदनाच्या प्रती अन्न सुरक्षा अधिकारी, जिंतूर पोलीस ठाणे आणि जिल्हाधिकारी परभणी यांना पाठविण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०५ जुलै २०२६


## विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक 'आयसीयू'; इकरा पब्लिक स्कूलचा एक अनोखा आणि यशस्वी पॅटर्न!



**जळगाव :** वैद्यकीय क्षेत्रात रुग्णाचा जीव वाचवण्यासाठी 'आयसीयू' अर्थात अतिदक्षता विभाग कार्यरत असतो, हे आपण नेहमीच पाहतो. परंतु, शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांमधील भाषेची अडचण दूर करून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जळगावच्या इक्रा पब्लिक स्कूलने 'मिशन एआयसीयू' (Academic Intensive Care Unit - शैक्षणिक अतिदक्षता विभाग) हा एक अत्यंत अनोखा आणि यशस्वी पॅटर्न सुरू केला असून, चालू शैक्षणिक वर्षातील नवीन प्रवेशांच्या पार्श्वभूमीवर या उपक्रमाची शिक्षण क्षेत्रात मोठी चर्चा होत आहे. शाळेत दरवर्षी मराठी, इंग्रजी आणि गुजराती माध्यमांमधून अनेक विद्यार्थी सेमी-इंग्रजी विभागात प्रवेश घेतात, मात्र अशा वेळी या विद्यार्थ्यांसमोर उर्दू भाषा शिकण्याचे आणि समजून घेण्याचे मोठे आव्हान उभे ठाकते. विद्यार्थ्यांची हीच नेमकी अडचण ओळखून इक्रा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. करीम सालार यांच्या दूरदृष्टी आणि संकल्पनेतून या नाविन्यपूर्ण 'मिशन एआयसीयू'ची पायाभरणी करण्यात आली असून, एकही विद्यार्थी भाषेच्या अडचणीमुळे मागे पडू नये आणि सर्वांना प्रगतीची समान संधी मिळावी हाच यामागचा मुख्य उद्देश आहे.या उपक्रमाचे कामकाज अत्यंत नियोजनबद्ध रीतीने चालत असून, विद्यार्थ्यांचे नियमित वर्ग विस्कळीत न करता दररोज एका विशेष तासिकेमध्ये म्हणजेच 'झिरो अवर' (Zero Hour) मध्ये या अप्रगत विद्यार्थ्यांवर भाषेचे मूलभूत संस्कार केले जातात. तज्ज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सलग ९० दिवस हा उपक्रम राबवला जातो, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना उर्दू वाचन आणि लेखनाचे अत्यंत सोप्या पद्धतीने सखोल प्रशिक्षण दिले जाते. ९० दिवसांचा हा शैक्षणिक 'बूस्टर डोस' पूर्ण केल्यानंतर, हे विद्यार्थी इतर नियमित विद्यार्थ्यांच्या बरोबरीने मुख्य अभ्यासक्रम शिकण्यासाठी आणि वर्गातील काठिण्यपातळीशी स्पर्धा करण्यासाठी पूर्णपणे सक्षम बनतात.गेल्या काही वर्षांत या यशस्वी पॅटर्नला अभूतपूर्व यश मिळाले असून, ज्या विद्यार्थ्यांना उर्दू भाषेची कोणतीही पूर्वओळख नव्हती, अशा १५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी या 'झिरो अवर' वर्गांच्या माध्यमातून अवघ्या ९० दिवसांत उर्दू वाचन आणि लेखनावर पूर्ण प्रभुत्व मिळवले आहे. इक्रा पब्लिक स्कूलच्या या क्रांतीकारी प्रयोगामुळे नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये अत्यंत समाधानाचे व विश्वासाचे वातावरण निर्माण झाले असून, हा शैक्षणिक आयसीयू पॅटर्न इतर संस्थांसाठीही एक नवा वस्तुपाठ ठरत आहे.

## शिवाजी महाविद्यालयामध्ये माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**कन्नड :** येथील शिवाजी महाविद्याल-यात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. श्री. वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त 'कृषी दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सुनिल गोरडे यांनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जीवन कार्यासंदर्भात सविस्तर माहिती दिली. तसेच महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त अर्थशास्त्र विभागाच्या वतीने "कृषी क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या आदर्श व्यक्ती आणि योगदान" या विषयावरती हस्तलिखित तयार करण्यात येणार असल्याचे सांगितले.हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करत असताना प्राचार्य डॉ. व्हि. एन. भोसले म्हणाले, कै. वसंतराव नाईक यांनी शेती आणि सिंचनाच्या क्षेत्रामध्ये भरीव स्वरूपाचे काम केले. हरितक्रांती, अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता, दूध उत्पादनाच्या बाबतीत श्वेतक्रांती, सहकाराचा विकास, जमीन सुधारणा, पंचायत राज, महाराष्ट्राचा औद्योगिक विकास, कृषी विद्यापीठांची स्थापना, रोजगार हमी योजनेची सुरुवात, कापूस एकाधिकार योजनेची सुरुवात, मोठ्या जलाशयांची निर्मिती, विद्युत प्रकल्पाची स्थापना, शेतीतील नवनवीन प्रयोग या कामामुळे वसंतराव नाईक कायम स्मरणात राहतील. कै. वसंतराव नाईक यांच्या कार्यामुळे महाराष्ट्र हा सामाजिक दृष्ट्या पुरोगामी, औद्योगिक दृष्ट्या विकसित तर आर्थिक दृष्ट्या संपन्न होण्यास मदत झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सोमेश्वर मोगरे यांनी आणि सूत्रसंचालन प्रा. हुकुमचंद पवार यांनी केले.या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्हि. एन. भोसले, उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर, आयक्यूएसी विभागाचे संचालक डॉ. विजय मातकर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

## सोस येथे उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांच्या उपस्थितीत एसआयआर प्रगणना फॉर्म वाटप व जनजागृती अभियान

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या मतदारयादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत जिंतूर तालुक्यातील सोस येथे जनजागृती सभा व प्रगणना फॉर्म वाटप कार्यक्रम दिनांक ३ जुलै रोजी दुपारी ३ वाजता उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात नागरिकांनी मतदारयादी अचूक,अद्ययावत व त्रुटीमुक्त करण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा,असे आवाहन उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी केले.यावेळी बोलताना उपविभागीय अधिकारी लाहोटी म्हणाले की, विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमादरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) प्रत्येक मतदाराच्या घरी भेट देऊन प्रगणना फॉर्मचे वितरण करणार आहेत.नागरिकांनी हा फॉर्म काळजीपूर्वक भरून त्यातील माहितीची खात्री करावी.आवश्यक असल्यास मागविण्यात आलेली कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून द्यावीत व मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना पूर्ण सहकार्य करावे.मतदारयादीतील प्रत्येक माहिती अचूक राहणे ही लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची बाब असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी त्यांनी प्रत्येक नागरिकाने स्वतःपुरते मर्यादित न राहता आपल्या कुटुंबातील सदस्य,नातेवाईक,शेजारी व मित्रपरिवार यांनाही या अभियानाबाबत जागरूक करण्याचे आवाहन केले. मतदारयादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, पत्रकार, राजकीय पक्षांचे मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (BLA), शासकीय अधिकारी, तलाठी, ग्रामपंचायत अधिकारी,पोलीस पाटील, मुख्याध्यापक,शिक्षक तसेच गावपातळीवरील सर्व यंत्रणांनी पुढाकार घेऊन जनजागृती करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाचे आयोजन अखिल भारतीय तालुका मराठी पत्रकार संघाचे जिंतूर तालुका अध्यक्ष बालाजी शिंदे सोसकर यांच्या पुढाकारातून करण्यात आले होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पोलीस पाटील सोमेश्वर उदावंत,महसूल सहाय्यक योगेश शिंदे, दैवशाला तुरे,अशोक पाटील,खमर शेख, भगवान पाटील,यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच माणिक शिंदे होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी (सेलू), नायब तहसीलदार नागेश देशमुख (सेलू), नायब तहसीलदार प्रशांत राखे (जिंतूर), तलाठी भीमराव वाकळे,ग्रामपंचायत अधिकारी संतोष कापुरे,बीएलओ पर्यवेक्षक गणहिरे पुरभाजी, केंद्रप्रमुख मयूर जोशी (जोगवाडा), बीएलओ रमेश तरटे, प्रवीण भिसे, शंकर पांचाळ, कोडबळे, तुळशीराम मुळे तसेच यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमादरम्यान उपस्थित नागरिकांना एसआयआर अभियानाचे महत्त्व, प्रगणना फॉर्म भरण्याची प्रक्रिया तसेच आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. गावातील नागरिकांनीही या अभियानाला सकारात्मक प्रतिसाद देत लोकशाही बळकट करण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.मतदारयादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक जागरूक नागरिकाने पुढाकार घेऊन जनजागृती करणे ही काळाची गरज असून, अचूक व पारदर्शक मतदारयादी तयार करण्यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करावे,असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## प्रा. पांडुरंग निळे यांचा सेवानिवृत्त समारंभास



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** ज्ञानोपासक कनिष्ठ महाविद्यालय, जिंतूर येथील उपप्राचार्य प्रा. पांडुरंग निळे हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या प्रदीर्घ, निष्ठावान व आदर्श शैक्षणिक सेवेला गौरविण्यासाठी सेवा हा सोहळा बुधवार, दि. १ जुलै २०२६ रोजी दुपारी १.०० वाजता ज्ञानोपासक महाविद्यालयाच्या वाचन कक्षात संपन्न झाला या सेवा गौरव समारंभास प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, माजी विद्यार्थी व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.प्रा. पांडुरंग निळे यांनी आपल्या सेवाकाळात विद्यार्थीकेंद्री शिक्षण, शिस्त, गुणवत्ता आणि संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना पुढील आयुष्यासाठी निरोगी, आनंदी आणि यशस्वी जीवनाच्या शुभेच्छा यावेळी मान्यवरांकडून देण्यात आल्या . यावेळी माजी विद्यार्थी पत्रकार विजय चोरडिया, मंचक देशमुख, मनोज राजुतिया, सुभाष मस्के, देवेंद्र अण्णा भुरे ,सचिन रायपत्रीवार,बि.डी.रामपूरकर(( पत्रकार )राहुल पाचलेगावकर अनेक मित्र परिवारांनी शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०५ जुलै २०२६


## कडुनिंब

कडुनिंबाचे झाड
किती डेरेदार
हिरवी हिरवी पाने
सावली देते गार

औषधी गुणधर्माची
कडुनिंबात खाण
गुढीपाडव्याला असतो
डहाळीचा मान

सदाहरित असते
कडुनिंबाचे झाड
काळ्या मातीत होते
जोमाने वाढ

सोनेरी रंगाची
चकाकतात कोवळी पाने
हवेत प्राणवायू
सोडतात जोमाने

पाच पाकळ्यांची
कडुनिंबाची फुले
हवेच्या तालावर जणू
चांदण्या डुले



- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

# संस्कृतातील भगवद्गीता प्राकृतात आणणारा पहिला वैचारिक बंडखोर - संत ज्ञानेश्वर

"जे जे भेटे भूत, ते ते मानिजे भगवंत." या एका वाक्यात संत ज्ञानेश्वरांच्या संपूर्ण तत्त्वज्ञानाचा सार दडलेला आहे. भारतीय संतपरंपरेत अनेक संत, महात्मे आणि तत्त्वज्ञ होऊन गेले; परंतु समाजातील ज्ञानाची दारे सर्वसामान्यांसाठी खुली करणारे, लोकभाषेला आध्यात्मिक प्रतिष्ठा मिळवून देणारे आणि धर्माच्या नावाने निर्माण झालेल्या बौद्धिक मक्तेदारीला धैर्याने आव्हान देणारे संत म्हणजे संत ज्ञानेश्वर.ते केवळ संत नव्हते, तर एक महान तत्त्वज्ञ, कवी, समाजसुधारक आणि वैचारिक क्रांतिकारक होते. त्यांनी तलवार उचलली नाही, रक्तपात केला नाही, सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न केला नाही; पण त्यांनी शब्दांचे सामर्थ्य वापरून समाजमनात अशी क्रांती घडवली की तिचे पडसाद आजही महाराष्ट्राच्या संस्कृतीत आणि भारतीय विचारविश्वात ऐकू येतात.ज्ञानावर मोजक्या लोकांची मक्तेदारीतेराव्या शतकातील भारतीय समाज अनेक सामाजिक बंधनांनी जखडलेला होता. धर्मग्रंथ संस्कृतमध्ये होते. संस्कृत शिकण्याचा अधिकार मोजक्या लोकांपुरता मर्यादित होता. बहुसंख्य जनतेला धर्म समजून घेण्याऐवजी तो फक्त ऐकण्याची परवानगी होती. तर मागासवर्गीय जातींना ते ऐकण्याची सुद्धा परवानगी नव्हती. ज्ञान हे काही विशिष्ट लोकांचे भांडार बनले होते.भगवद्गीता हा मानवजातीला दिशा देणारा महान ग्रंथ असला तरी तो सामान्य शेतकरी, मजूर, स्त्रिया, वंचित समाज आणि अशिक्षित लोकांपर्यंत पोहोचत नव्हता. अशा वेळी संत ज्ञानेश्वरांनी अत्यंत धाडसी निर्णय घेतला. त्यांनी भगवद्गीतेचा भावार्थ मराठी प्राकृत भाषेत मांडला आणि 'भावार्थदीपिका', म्हणजेच ज्ञानेश्वरी, हा अमर ग्रंथ निर्माण केला.हा केवळ अनुवाद नव्हता. हा ज्ञानाच्या लोकशाहीचा प्रारंभ होता.बंड तलवारीचे नव्हे, विचारांचेसंत ज्ञानेश्वरांना "बंडखोर" म्हणायचे असेल, तर ते वैचारिक अर्थाने होते. त्यांनी धर्माविरुद्ध बंड केले नाही; त्यांनी धर्माच्या नावाने उभारलेल्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. त्यांनी संस्कृतचा द्वेष केला नाही; तर लोकभाषेलाही ज्ञानभाषेचा सन्मान मिळावा, यासाठी प्रयत्न केला.त्यांचे बंड हे विध्वंसाचे नव्हते, तर परिवर्तनाचे होते. त्यांनी सांगितले की परमेश्वर सर्वांचा आहे, ज्ञान सर्वांचे आहे आणि मोक्षाचा मार्गही सर्वांसाठी खुला आहे.ज्ञानेश्वरी — मराठी संस्कृतीचा अमूल्य ठेवाज्ञानेश्वरी हा फक्त धार्मिक ग्रंथ नाही. तो मराठी भाषेचा पाया आहे. त्यात तत्त्वज्ञान आहे, साहित्य आहे, अध्यात्म आहे, समाजशास्त्र आहे, मानसशास्त्र आहे आणि जीवन जगण्याची दिशा आहे.ज्ञानेश्वरांनी अवघड संस्कृत तत्त्वज्ञान इतक्या सहज, सुंदर आणि काव्यमय भाषेत मांडले की सामान्य माणसालाही गीतेचा गाभा समजू लागला. त्यांनी ग्रामीण जीवनातील उदाहरणे, निसर्ग, शेती, नद्या, पक्षी, प्राणी यांचा आधार घेत अध्यात्म समजावून सांगितले.समतेचा संदेशज्ञानेश्वरांच्या विचारात कोणताही भेदभाव नव्हता. जात, धर्म, लिंग, संपत्ती किंवा जन्म यापैकी कोणत्याही गोष्टीवर त्यांनी माणसाचे मूल्य ठरवले नाही. त्यांच्या दृष्टीने प्रत्येक जीवात परमात्मा आहे.आज जग मानवाधिकार, समानता आणि सामाजिक न्याय यांची चर्चा करत आहे. संत ज्ञानेश्वरांनी हे विचार सातशे वर्षांपूर्वी आपल्या कृतीतून दाखवून दिले.भाषा म्हणजे लोकांचा आत्माएखाद्या समाजाची भाषा म्हणजे त्याचा आत्मा असतो. लोकांना त्यांच्या स्वतःच्या भाषेत ज्ञान मिळाले तर ते विचार करू शकतात, प्रश्न विचारू शकतात आणि परिवर्तन घडवू शकतात.ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेला केवळ साहित्यिक प्रतिष्ठा दिली नाही, तर तिला अध्यात्माची भाषा बनवले. त्यामुळे पुढे संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत जनाबाई यांसारख्या संतांची समृद्ध परंपरा निर्माण झाली.आजच्या काळातील संदेशआज माहितीचे युग आहे. इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानामुळे ज्ञान सर्वत्र उपलब्ध आहे. पण तरीही अनेक लोक शिक्षणापासून आणि गुणवत्तापूर्ण माहितीपासून वंचित आहेत.संत ज्ञानेश्वरांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे—ज्ञान प्रत्येक माणसापर्यंत पोहोचले पाहिजे. भाषा ही अडथळा नसून पूल बनली पाहिजे. शिक्षण हे विशेषाधिकार नसून प्रत्येकाचा अधिकार असला पाहिजे.. संत ज्ञानेश्वर हे महाराष्ट्राचे नव्हे, तर संपूर्ण मानवजातीचे विचारवंत आहेत. त्यांनी संस्कृतमधील भगवद्गीतेचा भावार्थ मराठीत आणून सामान्य माणसाला ज्ञानाचा प्रकाश दिला. ही कृती त्या काळातील सामाजिक आणि वैचारिक व्यवस्थेला दिलेले शांत, पण प्रभावी आव्हान होते.त्यांचे बंड हे प्रेमाचे, समतेचे, ज्ञानाचे आणि मानवतेचे बंड होते. त्यांनी कोणालाही पराभूत केले नाही; त्यांनी अज्ञानाचा पराभव केला. त्यांनी कोणाचे सिंहासन पाडले नाही; त्यांनी ज्ञानाची दारे सर्वांसाठी खुली केली.आज आपण संत ज्ञानेश्वरांना अभिवादन करायचे असेल, तर त्यांच्या ग्रंथांचे वाचन करणे, त्यांच्या समतेच्या विचारांचा स्वीकार करणे आणि ज्ञान प्रत्येकापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.ज्ञान सर्वांसाठी, धर्म सर्वांसाठी आणि माणूसपण सर्वांत श्रेष्ठ—हीच संत ज्ञानेश्वरांच्या जीवनकार्याची अमर शिकवण आहे.या लेखातील "पहिला वैचारिक बंडखोर" हा उल्लेख साहित्यिक आणि विचारप्रवर्तक अर्थाने वापरलेला आहे. इतिहासात अशा प्रकारचे मूल्यांकन विविध अभ्यासकांकडून वेगवेगळ्या प्रकारे केले जाते, त्यामुळे तो निर्विवाद ऐतिहासिक निष्कर्ष म्हणून नव्हे तर एका वैचारिक दृष्टिकोनातून समजावा.

(शब्दांकन:-भूमिपुत्र वाघ)

## गर्वाचा तोरा

किती वेळ टिकणार तोरा,
नाचणाऱ्या मोराला विचारा.
नाचून नाचून थकल्यावर,
आवरून घ्यावे लागते पसारा.

गर्वाचा तोरा तुझा,
काही काळच टिकतो.
रागाच्या भरात तुला,
बाजारात नेऊन विकतो.

समाजात जगतांना,
नाही रे बरा तोरा.
सत्य सांगतो तुला,
कान देऊन ऐक पोरा.

यश मिळताच माणसाचा,
बदलत असतो तोरा.
भूतकाळ सारे विसरून,
होऊन जातो तो कोरा.

तोऱ्यात मिरवतांना,
कळणार नाही धोके.
वास्तव समजल्यावर,
ठिकाण्यावर येते डोके.

- नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर






## जे.ई.एस. महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदी प्रा. डॉ. उमेश मोगले यांची नियुक्ती.



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** : एज्युकेशन सोसायटी संचलित जेईएस महाविद्यालय, जालना, येथील वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख व प्राध्यापक डॉ. उमेश पांडुरंग मोगले यांची उपप्राचार्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रा. डॉ. मोगले यांना २३ वर्षांचा अध्यापनाचा प्रदीर्घ अनुभव असून त्यांनी अध्यापन, व संशोधन, क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे. संशोधन क्षेत्रात त्यांनी ९ पेटंट प्राप्त केले असून ६५ संशोधन निबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले आहेत. तसेच त्यांनी ९ संदर्भग्रंथांचे लेखन केले आहे. ते मान्यताप्राप्त पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली ५ संशोधकांनी पीएच.डी. पदवी संपादन केली आहे.सन २०१० पासून ते Bioscience Discovery या आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकाचे संपादक म्हणून कार्यरत आहेत. प्रा. डॉ. उमेश पांडुरंग मोगले यांच्या उपप्राचार्यपदी झालेल्या नियुक्तीबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री.पुरुषोत्तमजी बगडिया , सचिव श्री. श्रीनिवासजी भक्कड , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेशजी अग्निहोत्री , तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०५ जुलै २०२६


## अखेर चारठाणा अपर तहसील कार्यालय मंजूर व शेतकऱ्यांची रॉयल्टीही रद्द



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : तालुक्यातील चारठाणा येथे अपर तहसील कार्यालयास मंजुरी देणे तसेच शेतकऱ्यांसाठी गौण खनिजावरील रॉयल्टी रद्द करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल नानासाहेब राऊत. व ईतरांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे आभार मानले. या निर्णयामुळे चारठाणा व परिसरातील नागरिक तसेच शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.चारठाणा परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांपासून अपर तहसील कार्यालयाची मागणी प्रलंबित होती. महसूलविषयक विविध कामांसाठी नागरिकांना जिंतूर येथे जावे लागत असल्याने वेळ आणि पैशाचा मोठा अपव्यय होत होता. शासनाने अपर तहसील कार्यालयास मंजुरी दिल्यामुळे आता परिसरातील नागरिकांना महसूल विभागाच्या सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार असून प्रशासन अधिक गतिमान होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.याशिवाय शेतीच्या कामांसाठी आवश्यक असणाऱ्या माती, मुरूम व इतर गौण खनिजांवरील रॉयल्टी रद्द करण्याच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. शेतीचा वाढता खर्च, नैसर्गिक संकटे आणि उत्पादन खर्चाच्या पार्श्वभूमीवर शासनाचा हा निर्णय शेतकरी हिताचा असल्याचे नानासाहेब राऊत यांनी सांगितले.मुंबई येथे झालेल्या भेटीदरम्यान नानासाहेब राऊत यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. चारठाणा परिसराच्या विकासासाठी शासनाने घेतलेल्या निर्णयांबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. तसेच भविष्यातही चारठाणा परिसरातील प्रलंबित विकासकामांना गती देण्याची विनंतीही त्यांनी यावेळी केली.या निर्णयांमुळे चारठाणा परिसरातील नागरिक, शेतकरी, व्यापारी व विविध सामाजिक संघटनांमध्ये समाधानाचे वातावरण असून, शासनाने लोकहिताचे निर्णय घेतल्याबद्दल सर्व स्तरांतून समाधान व्यक्त केले जात आहे.फोटो कॅप्शन : चारठाणा अपर तहसील कार्यालयास मंजुरी आणि शेतकऱ्यांची रॉयल्टी रद्द केल्याबद्दल महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांची भेट घेऊन नानासाहेब राऊत , भाजप उपाध्यक्ष अविनाश काळे, पंचायत समिती सदस्य राजेंद्र नागरे, गंगाधर तरटे यांनी आभार व्यक्त केले.

## १,२०० कोटींचा जामनेर प्रकल्प: रोजगाराची सुवर्णसंधी की प्लास्टिक आणि भूजल प्रदूषणाचे नवे संकट?

**नाशिक** : गुगलवर सर्च करत असताना 'लोकसत्ता'च्या ४ जुलै २०२६ च्या अंकातील आलेले हे वृत्त वाचनात आले. या वृत्तात जळगाव जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी एक अत्यंत मोठी घडामोड घडणार असल्याचे वाचले. मध्यंतरी झालेल्या दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेतील चर्चेनंतर, आता थेट विधानभवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली जामनेरमधील 'हिंदुस्तान कोका-कोला बेव्हरेजेस'च्या १,२०० कोटींच्या ग्रीनफिल्ड प्रकल्पासाठी उच्चस्तरीय आढावा बैठक पार पडल्याचे या वृत्तात म्हटले आहे. या प्रकल्पामुळे उत्पादन, लॉजिस्टिक्स, पॅकेजिंग आणि वाहतूक क्षेत्रात हजारो प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगाराच्या विविध संधी निर्माण होतील, ही बाब निश्चितच स्वागतार्ह आहे. या प्रकल्पामुळे खान्देशच्या औद्योगिक प्रगतीला मोठी गती मिळण्यास मदतच होईल.शासन आणि प्रशासन या प्रकल्पाची अंमलबजावणी अत्यंत तत्परतेने करेलच, पण यासोबत तितकीच तत्परता स्थानिक जलस्रोत आणि पर्यावरण रक्षणासाठी दाखवणे गरजेचे आहे. कोका-कोला कंपनीचा जगातील व भारतातील इतिहास सर्वच जाणतात. भारतातील केरळमधील प्लाचीमाडा आणि राजस्थानमधील काला डेरा येथील भूजल उपसा हा वादग्रस्त होता. हे सर्व लक्षात घेऊन स्थानिक प्रशासन, राज्य शासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्ड आदी सर्व विभागांनी या प्रकल्पाकडे निव्वळ 'आर्थिक गुंतवणूक' म्हणून पाहू नये, अशी पर्यावरणप्रेमींची व नागरिकांची अपेक्षा आहे. पर्यावरण जाणकारांमध्ये अशी चर्चा आहे की, हा प्रकल्प आपल्यासोबत मोठ्या प्रमाणावर 'सिंगल-युज प्लास्टिक'चा कचरा आणि पाण्याचे संकट घेऊन येण्याची भीती आहे व ती नाकारता येत नाही.जळगाव जिल्हा आणि एकूणच खान्देश भाग हा आधीच उन्हाळ्यातील भीषण तापमान (४५°C च्या पार) आणि पाणीटंचाईचा सामना करत आला आहे. अशा निम-कोरड्या भागात दररोज लाखो लीटर पाण्याचा उपसा करणाऱ्या आणि लाखो प्लास्टिक बाटल्यांची निर्मिती करणाऱ्या कारखान्याला मंजुरी देताना शासनाने केवळ व्यावहारिक पातळीवर 'रोजगार निर्मिती' या भूमिकेतून न पाहता, 'पर्यावरणपूरक धोरण' ठेवणे गरजेचे आहे. या कारखान्यामुळे स्थानिक शेतीचे पाणी आटणार नाही आणि परिसरात प्लास्टिकचा खच पडणार नाही, याची शाश्वती प्रशासनाने घेणे अनिवार्य आहे.या पार्श्वभूमीवर, राज्य शासन, स्थानिक प्रशासन आणि कंपनीने खालील त्रिसूत्रीवर तातडीने पावले उचलली पाहिजेत, तरच पर्यावरण व जलसंपत्तीचा विनाश होणार नाही.पहिली गोष्ट म्हणजे, सीएसआर (CSR) अंतर्गत व्यापक जलसंधारण करण्याची योजना आखली पाहिजे. त्यासाठी कंपनीने 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी' (CSR) स्वीकारली पाहिजे असे बंधन घालणे गरजेचे आहे. जामनेर परिसरातील जुने बंधारे आणि जे तलाव गाळाने भरले आहेत ते उपसणे आणि जलसंधारणाची मोठी कामे कंपनीने स्वखर्चाने करण्याचे बंधन हवे; आणि अशी मागणी स्थानिक जनतेने प्रशासनाकडे केली पाहिजे.दुसरे म्हणजे, भूजल उपशावर कडक मर्यादा घातल्या पाहिजेत व ऑडिट करणे बंधनकारक हवे. 'एमआयडीसी' (MIDC) आणि केंद्रीय भूजल प्राधिकरणाचे कंपनीच्या पाण्याच्या उपशावर कडक नियंत्रण असावे. कंपनीने जितके पाणी वापरले, त्याहून अधिक पाणी 'रेन वॉटर हार्वेस्टिंग'च्या माध्यमातून जमिनीत जिरवणे बंधनकारक करावे.तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे, शून्य सांडपाणी आणि प्लास्टिक कचरा व्यवस्थापन (ZLD & EPR) ही प्रमुख जबाबदारी त्यांनी स्वीकारली पाहिजे. कारखान्यातील रासायनिक सांडपाण्यामुळे जामनेरची शेतजमीन प्रदूषित होणार नाही, यासाठी 'झिरो लिक्विड डिस्चार्ज' (ZLD) प्रणाली सक्तीची करणे गरजेचे आहे. तसेच, उत्पादित होणाऱ्या प्लास्टिक कचऱ्याच्या पुनर्वापरासाठी कंपनीने ती 'विस्तारित उत्पादक जबाबदारी' (EPR) नियमांतर्गत स्वीकारली पाहिजे.खरोखरच जळगाव जिल्ह्यातील तरुणांना उद्योग आणि रोजगाराची मोठी भूक आहे, पण या प्रकल्पामुळे निर्माण होणारी रोजगाराची संधी जमीन, पाणी आणि पर्यावरणाचा बळी देऊन निर्माण होणे नक्कीच उचित ठरणार नाही. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या वेगवान हालचालींमध्ये जलसंधारणाचा आणि प्रदूषण नियंत्रणाचा मुद्दा सर्वोच्च प्राधान्यावर राहिला पाहिजे, हीच माझी जाहीर मागणी आहे; तरच हा प्रकल्प जामनेरसाठी खऱ्या अर्थाने 'वरदान' ठरेल. हवामान व तापमान बदलाच्या या भीषण संकटात विकास शाश्वत (Sustainable) असावा हीच खरी गरज आहे.







महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०५ जुलै २०२६

# श्रीधररेषा - रंगरेषांचे चित्रचिंतन श्रीधर अंभोरे




महावीर भाई जोंधळे यांनी हे ललितचित्र चिंतन लेखन केले आहे.एक रंगरेषांचा आत्मिक स्वानंद घेऊन जगणारे जागतिक ख्यातकीर्त चित्रकार श्रीधर अंभोरे दादा.या अफाट आदिम डोंगर झाडांच्या कुशीतला रंगरेषांचा अवलिया.पुस्तकांच्या माथ्यावर कपाळभर रेषांच गोंदण देवून ते ओंजळभर सुखाची मनतृप्ती देणारं मुखपृष्ठकार. आशय संपन्न सृजन समर्पक भावनेचा मृतीमंत साक्षात साक्षात्कार देणारी काळ्याभोर घनगर्द रंगरेषा जणू ही माय मातीची महिरपी मैफिल."या रेषेची एकविचारप्रणालीआहे.ती व्यक्तीगत स्वरुपाची नसते.तर ती समूह स्वरुपाची असते, म्हणून आकलनात गुंतागुंत होत नाही.कारण ती वास्तववादी मांडणी असते.जगण्याची जीवघेणी स्पर्धा आणि नको त्या वैश्विक भिन्नता,अभिन्नते अडकून पडणे हा या चित्रकाराचा प्रांत नाही.माणूस बदलांचा सिध्दांत मांडत जातांना त्याच्या रेषा इतक्या सजीव होतात की,विषमतेविषयी वेगळं भाष्य करण्याची गरज पडत नाही, म्हणून तर अर्थ भिन्नत्वाचं अकारण वास्तव होतं नाही."(पृ.४०)ही चित्ररेषांची परिभाषा मानवी तळाचा अंतरंग ढवळून काढते.इतकी मनस्वी चिंतनरेषाचं आकलन महावीर भाई नी मांडले आहे.श्रीधर दा मन मुक्त एक रानं भैरी पाखरू होऊन झाड फांदीवर बसून रंगरेषांचे गाणे गात हे झाडं फांद्याचे गणगोत दादांनी अखंड डोळ्यात भरून घेतले.अन् कोऱ्या कागदावर काळ्या किभिन्न रेषांचा आंबाडा बांधावा अन् त्या मनमुक्त मोरनीनं रंगरेषाच्या मनात नाचवं इतकं नखक्षिकांत त्या रानं शिवार योगिनीच चित्र मन मोहित करणारं.झाडं फांदीला लगडलेल्या चांदण्याची माळ जणू सखीच्या गळ्यातील मोतीक हार.झाडं पानं फुलांनी बहरून आलेलं ते अस्सल कुण्या वाटसरूच्या वाटेवरती फुलांची पखरण.झाडं फांदीवर असंख्या लक्ष पाखराचे थवे.रांगेने बसलेले पक्षी.जणू पाखरांची झाडं फांदी.तथागत बुद्धांच्या पिंपळ पान.त्यावरअतिशय मनस्वी रंगरेषा जीव जगण्याचा सारं मांडणाऱ्या.काळ्यामातीची घागर त्यावर दोन पाखरांचे जीव अनंत युगाची तहान.त्यात एक काळोखी सावली.पुन्हा फुटलेली अथांग घागर.घागरीचा अथांग सागरकाठावर बसलेले नाळ नांत्याची पाखरं.काठावर एक निस्सीम श्रद्धेचं झाडं.या घागर काठावर दोन जीवांचे पक्षी.घागर फुटलेली.काठ तुटलेला.काठ जणू तिचा ओठ.एक तथागतांची पिंपळवृक्षांच्या पानाने लगडलेली बुद्धांची उभी मुर्ती.अथांग रेषांचा महापूर.यापुरात माणूस जीवांचा काळा आक्रोश.तर रेषांच्या पुरात काळ्या झाडांचे मरण आक्रंदन रानं गायींचा कळप.कळपातला खांदेकरीवशिंड वळू.घनगर्द वेळूंच्या बनात तथागत गौतम बुद्ध एका ध्यानस्थ मुद्रेत.एक काळूखी भिंत.डोईभरून पांढरा पदर मोठाले ओठ,नाकात रानफुलांची नथनी.असं काळोख्या ओढीचं चित्र, काळ्या कुरळ्या केसांचा बुद्ध,स्मित हास्य निवांत काळ्या भिंतीला टेकून निद्रिस्त.युगाच्या खोडाचं झाडं.झाडांच्या सावलीत सगळ्यांचं जोडपं.वर उंच निष्पर्ण फांद्यावर या युगांची पाखरं.रानं माळावर बकऱ्यांचा कळप, एकमेकींना गळ्यात गळे घालून सुखाच्या परमोच्च बिंदू पर्यंत.तर नेमकं तेचं बाईच बाईलाच सल उमगते.तिचं तिलाच ओटीपोटीचं कळतं.बायकांच्या गर्दीत बकरी बाईकून मानेला खाजवून घेते.दुःखाचे चऱ्हाट थोडं ढिलं करून घेते. काळ्याभिंतीवर वानरं, म्हाळ्या, वानरनी, अन् छोटी पिल्लं.काळाकडे टक लावून पाहणारी पांढरीशुभ्र.भिंतींवर लोंबकाळ शेपूट हे नरवानरा हेच निर्लेप निस्पृह जगणं.गळाभरून फुलांचा साज,कानातही फुलांची नथनी एक नवथर ललना,स्तनाग्रेवर फुलांची रांगोळी रेखलेली.लाबसडक काळेभोर केस कंबरेपर्यंत.ही प्रेमानुबंधाची चित्रे,तर डोईवर घड्यावर घडे,पाठमोरी कष्टवंत बायांची चित्रे.डोईवर जगण्याचं भलामोठं गाठोडं कंबरेवर लेकरू अन् मायीच्या बोटाला धरून चालणार एक लेकरू.बाईचा कास्टा.श्रमाचं निक्षिकांत चिंतन चित्र.फक्त डोळ्यात रेषांच्या अदम्य् इच्छा घेऊन सभोवताल पाहणारं एक माणूस.तर खांद्यावर फावडं कष्ट,भाकर अन् मातीचा महिरप.तर डोईवर टोपलं त्यात दगडं गोटे,एक श्रमिक जोडपं.एक दगडं.दगडाचा माणूस,खाली काळे किभिन्न दगडाचीचं आदिम संस्कृतीचे दर्शन.दगड माणसांच्या शिळेवर युगांची कावळे बसलेली.ही चित्ररेषा मनोज्ञ भाव कल्लोळ मांडते.संथ नदीची लाट.लाटेवर स्वार एक अनभिज्ञ ललना.बाईंच्या डोक्यावर भलेमोठे बोचके, काखेत लेकरू,एक बाई काखेत हातात अन् डोईवर बोचके, लेकरांच्या डोक्यावर ही बोचके या भेदक वास्तवाची जाणीव म्हणजे कोरोना महामारीचा काळ.रेषांग फक्त बाईचे मोकळे वाऱ्यावर सोडलेले केस. मोकळा पदर ही केवळ मनमुरादपणे स्वैर एक बाईचं प्रेमभावनेचं अथांग रेषांगाचं मुक्त जगणं.मायी बाईचं मातृत्व आभाळ अथांग मांडीवर लेकरू घेऊन मातृत्व पाजते आहे.पान्हा फुटलेले अमोघ मायेचे घन.. शेळ्या राखणारी झाडाफांदी बकऱ्यांना खाऊ घालणारी,फांद्या कापणारी जंतर इळ्याची धारदार खुडी.एक बुचडा बांधलेली रानभैरी खुडी घेऊन उभी.माणसा सारखी माणसं काळ्या मातीची पण जातीच्या नावाने उभी.एक बाई माणूस या सृष्टीची मानवनिर्मिती.लक्ष पाखरांची थवे त्यांची किलबिल झाडांच्या फांद्यांवर झोके घेत आभाळभर उडणारी.पुन्हा काळाखाप दगडं त्या दगडावर दगड होऊन दगडी माणसं आपसात बोलत आहेत.डोक्यावर दगडांची गोलगीटिंग शिळं.गावगल्लीतले कुत्र्यांचा कळप.मोठी जाणती कुत्रे आपसात बोलता आहेत.त्याच्या पायालगत कुत्र्यांची पिले रांगताहेत.या रेषांनी आजची राजकीय सामाजिक वास्तवतेची व्यवस्था दाखवली आहे.या रानझाडी कत्तल उन्मळून पडलेलं युगांचं झाडं.निष्पर्ण फांद्यावर पाखरांचा आक्रोश.सारा नी सगळाच दुःखाचा काळोख.काळी सावली हे झाडांच्या मरणाची दुःखद सावली मातीवर उमटलेली.एक रेषा मोर,दोन रेषा पाय, अन् एक फांदी फुलांनी लगडलेली तो मोर पिसारा हा रेषांचा मोर म्हणजे श्रीधर दादांची लाघवी ओळख.मोठाकाळा दगडं त्यावर तिनं दगडांची उतळन लगोर.ही रेषांची अनभिषिक्त डीकमाळ एक सृजनशील अर्थ वलायांकित करते.स्त्रीपुरूष देहाच्या असक्त वासनेचा श्रृंगार मानवी मनाची नितळ मनोमिलनाची भावना अनावर होऊन ती दोन पाखरं तृप्त होतात.ती पाखरं भूक ,भाक, भाकरीच्या काठावर गुलाबी संवाद करतात.ही मानवी मनाची नितांत नितळ निर्लेप भावकविताचं आहे असे रेषांचे श्रीधर.श्रमिकांची हाडांची सापळे, डोक्यावर टोपले, हातात फावडे,पहार, बाईच्या कडेवर लेकरू डोक्यावर पाटी.पाटीत जळतनं ही तिनं रेषांची चिंतन आशय संपन्न चित्रे.अमेरिकेत श्रीधर अंभोरे दादांच्या चित्रांची नोंद घेतली आहे.एक कलावंत या मायमातीला आपल्या रंगरेषाच्या हातानी कवेत घेतो.हाताचे अखंड झाडं.झाडांच्या फांदीवर जीवा शिवांचे दोन पक्षी.अन् रेषांचा कलावंत या मायाळू झाडाला आपली सृजनशील ऋणाई व्यक्त करतो.सातासमुद्र पार करीत पुन्हा ती दगडांची भिंत तिला सागर लाटांचा खळाळ अन् त्या दर्यावर्दी अनुभूती या रंगरेषांनी दरी कपारीतून पुन्हा मनाचा खळाळ रेषानुंबध केला आहे तो अतिशय आशय संपन्न सृजन समर्पक.बुध्दफक्त एका रेषांचा.ओठ नाजूक हनुवटी.पुढे दोरीवर माणसाचे लटकलेले कलेवर कपडे वाळू घालावेत तसे हे रेषांचे जगण्याचे काटेरी वास्तव आहे.बोकड्याचं कातडं मिठ लावून वाळू घालव.तसं माणसाची मातीमोल त्वचा.या श्रीधररेषा मध्ये अंतिम तिचं काळे निळे लहान मोठे झेंडे दाखवून दंगे, मोर्चे, मिरवणूका,यात तुफान नाचणारी या व्यवस्थेची माणसे.अशी या रंगरेषांच्या चित्रांची एक गुढ अकल्पनीय मनोज्ञ भावनीक संगम या चित्रकारांची ही ओळख आहे. डॉ.रणधीर शिंदे यांच्या चिंतन आशय मर्मग्राही आस्वादक 'चितनशीलतेचा दाट रेषासंदर्भ'प्रस्तावनेत ते लिहितात " महावीर जोंधळे यांचे अंभोरे यांच्या रेषाचित्रांविषयीचे हे मुक्त स्वरूपाचे चिंतन लेखन आहे.ते मोठ्या प्रमाणात आस्वादात्मक व भावदर्शी आहे.अंभोरे यांच्या रेषाचित्रांचा त्यांच्या मनावर जो ठसा उमटला आहे.त्याला काही एक प्रमाणात चौकटबद्ध करण्याचा हा प्रयत्न आहे.(पृ.१०) सर्वव्यापी चित्रबद्ध संवेदना या चिंतन लेखात ते लिहितात "मुलभूत सत्याच्या आधारानं श्रीधर अंभोरे कार्यरत असतो.घरहिन संस्कृतीला रेषेतून जीवंत करणारा कलाकार म्हणून त्यांचा कला, समीक्षक विचार करीत असतो.कलेतील नवता,चित्रातील भाषा,रेषांचे प्रगटीकरण, आणि त्यातून दिसणारी भावनिक रूप आस्वादकांना नवीन दृष्टी देतं जातात"(पृ.२६)ही चित्रं चिंतन संवेदना अत्यंत निस्सीम श्रद्धेने श्रीधर अंभोरे यांनी अखंड प्रज्ञावंत शीलवंत कुलवंत म्हणून जोपासली आहे.महावीर जोंधळे यांनी त्या त्या चित्रात,सूचक मानवनिर्मिती, एकतत्वशैली,उभंआडवं आणि तडक, अमेरिकेत ही श्रीधर या पाच टिपन परिक्षणात त्यांच्या रेषांनुबंधाचा इतका अप्रतिम आशय संपन्न सृजन समर्पक विवेचक समृद्ध सकारात्मक विचारधारेने हे सारं खोलवर मांडले आहे.या चित्राविषयी गावंखेडे तिथली श्रमिक माणसं, रानवाटा रानशिवार,नदीबकऱ्या,गाई गुरांचे कळप आणि काळ्या काटेरी फांद्याच्या बाभळी,काटेरी झुडपे बोरी बाभळी.आयाबायांच्या कटी खाद्यावर लेकरं.तथागत बुध्दांचे विविध चिंतनांचे भावपदर या संपूर्ण रेषांचाश्रीधर या चित्रचिंतन लेखातून सह्दय सृजनशील स्नेहाळू भावनेनं खऱ्याखुऱ्या कलावंताचं दर्शन घडवलं आहे.माणूस म्हणून जात पात धर्म पंथ या साऱ्या पलीकडेचे मैत्री जोपासणारे श्रीधर अंभोरे.कुंडीतल्या झाडं वेलीवर अतोनात प्रेम करणारे.तर चिखल माती वरच्या झाडपाना फूलांवर अमोल रंगरेषांची गुंफण करणारा हा कलावंत अवघ्या साहित्यरसिकांचा अन् पुस्तकांच्या पानावरचे श्रीधर अंभोरे."अपेक्षा ठेवून मैत्री नाही.जाती-पातीच्या पलिकडे जाऊन दोस्ती करावी त्यांनीच.अगदी कलंदरपणाला जपत जपत.जे करायचं ते मन लावून.मोजक;पण मुद्याचं बोलनं.क्षणाक्षणाच्या आधारानं पुढं पुढं जाणारा हा अवलिया खेळतो आहे.रंगाशी,रेषांशी, अर्थगर्भी वास्तवाशी (पृ.७५) श्रीधर अंभोरे दादांचा रेषांचा खेळीया हा या सृष्टीच्या आत्म्याशीतादात्म्य होतो याचा प्रत्यय या चित्रचिंतन लेखनात आले आहे.'यशवंत मनोहर ब्लर्ब लिहितात"श्रीधररावाचं मन म्हणजे विद्युतरेषांचं निबड जंगल!रेषा हीच या रेषावीरांची मातृभाषा होतेआणि या मातृभाषेचा मोर त्याच्या अस्तित्वाचा सन्मानार्थ होऊन जातो.आपणासही या रेषा सम्राटाच्या रेषामध्ये गुंतलेला आपला जीव अपूर्व सौंदर्याच्या बातम्या देत राहतो.(मलपृष्ठ)ही अतिशय चिंतन आशय संपन्न पाठराखण या कलावंतांचे अधिष्ठान आहे.शब्दशिवार प्रकाशनाने अतिशय मौलिकग्रंथ केला आहे.मुखपृष्ट सजावट स्नेहाळू सन्मित्र नारायण पाझाडे/सुदर्शन ढगे यांचे आहे.रंगरेषांचे ललितचिंतन अतिशय उत्तम आशय संपन्न सृजन भावनेचा ओलावा देणारी ही देखणी कलाकृती श्रध्देय महावीर जोंधळे सरांचे मन:पूर्वक अभिनंदन व शुभेच्छा.



पुस्तक परिचय:-डॉ प्रभाकर शेळके,
जालना संवाद:-९९७५१३७३३७